पुण्य-नगरी पु. पान क्र. 1

## गुटखा, मेफेड्रोन पोलिसांनी केला हस्तगत



**वसई** : नायगावातून ३३ लाखांचा गुटखा, तर नालासोपारातून साडेतेरा लाखांचा मेफेड्रॉन हस्तगत करण्यात आले आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरुन गुटखा आणण्यात येणार असल्याची माहिती नायगाव पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी बापाणे येथील करिश्मा ढाब्यासमोर संशयित टेम्पो अडवल्यावर त्यात निरनिराळ्या कंपनीचा गुटखा सापडला. त्यामुळे टेम्पो चालक मोहम्मद अझरुद्दीन शेख (३०) याच्यावर गुन्हा दाखल करून १० लाखांच्या टेम्पोसह त्यातील गुटखा असा एकूण ४३ लाख २५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. दुसऱ्या घटनेत नालासोपारा पूर्वेकडील प्रगती नगरात धाड टाकून तुळींज पोलिसांनी लाखो रुपये किमतीचा मेफेड्रोन पकडला आहे. अच्छेबे गर्मिने (२६) ही नायजेरियन महिला मेफेड्रॉन विकत असल्याच्या माहितीवरून तुळींज पोलिसांनी तिच्या ताब्यातील १३ लाख ६८ हजार रुपये किमतीचे ६८.४ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करून तिला अटक केली आहे.

पुण्य-नगरी पु. पान क्र. 02

## गावठी कट्टा, काडतूस हस्तगत

**वसई** : नालासोपाऱ्यातील एका तरुणाकडून एक गावठी कट्टा आणि जिवंत काडतूस हस्तगत करण्यात आले आहे. तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने ही कारवाई केली. पूर्वेकडील नालेश्वर नगरच्या पाठीमागील मोकळ्या जागेत एक तरुण गावठी कट्टा बाळगून असल्याची माहिती गुन्हे प्रकटीकरण शाखेला मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून रूद्रेश सावंत या तरुणाला पकडण्यात आले. त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे एक गावठी कट्टा आणि एक काडतूस सापडले. नंतर रुद्रेशला तुळींज पोलिसांनी अटक केली.

पुण्य-नगरी पान क्र. 07

## दोन वेगवेगळ्या अपघातांत दोन चालक ठार, २ जखमी

**वसई** : महामार्गासह वसईत झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोन चालक ठार झाले असून क्लीनरसह अन्य एक जण जखमी झाला आहे. टेम्पोचालक सोहेल जुजारा हा क्लीनर ओवेश उबलीसह टेम्पोने माल घेऊन मुंबई-अहमदाबाद महामार्गावरुन वडोदराला निघाला होता. भारोळ गावच्या हद्दीत टेम्पो आल्यावर खानिवडे टोलनाक्याच्या पुढील टेम्पोने अचानक ब्रेक लावला. त्यामुळे सोहेलचा टेम्पो मागून त्यावर आदळला आणि त्यात सोहेलचा जागीच मृत्यू झाला.तर क्लीनर ओवेश जखमी झाला.याप्रकरणी मांडवी पोलिसांनी टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दुसऱ्याअपघातात दुचाकीस्वार अतुल दुबळा ठार झाला असून, त्याच्या मागे बसलेला राहुल डबले गंभीर जखमी झाला आहे. अतुल राहूलसह शुक्रवारी सायंकाळी उड्डाणपुलावरून दुचाकीवरून निघाला होता. भरधाव वेगाने जाताना वळणावर नियंत्रण सुटून खाली कोसळला.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुण्य-नगरी पान क्र. ०५

# नालासोपारा पूर्वेत फेरीवाल्यांच्या अतिक्रमणामुळे रस्ते झाले जाम

## ▌अग्निशमन, रुग्णवाहिकांनाही मिळेना वाट, फेरीवाल्यांची दादागिरी लागलीय वाढू



▌**वसई :** फेरीवाल्यांच्या अतिक्रमणामुळे नालासोपारा पूर्वेकडील सर्वच रस्ते जाम होत असल्यामुळे अग्निशमन दल, शववाहिनी आणि रुग्णवाहिकांसारखी अतिमहत्त्वाच्या वाहनांना वाट मिळेनासे झाली आहे. नालासोपारा पूर्वेला सेंट्रल पार्क, आचोळे रोड, तुळींज पोलीस ठाणे परिसर, गालानगर, रेल्वे स्थानक परिसर, संतोष भुवन, धानिवबाग, वालईपाडा, शांतीपार्क, संयुक्तनगर या प्रमुख रस्त्यांसह सर्व अंतर्गत रस्त्यावर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले आहे.

या फेरीवाल्यांकडून पालिकेचे ठेकेदार दररोज बाजार कर वसूल करतात. त्यातून ठेकेदारांना दरमहा कोट्यवधी रुपयांची कमाई होते. जितके जास्त फेरीवाले वाढतील तसा ठेकेदाराचा नफा वाढत जात असल्यामुळे हे ठेकेदार फेरीवाल्यांना रस्त्यावर अतिक्रमण करण्यास सांगतात. तर स्थानिक कथित समाजसेवक, माजी नगरसेवक अशा फेरीवाल्यांकडून दरमहा आर्थिक वसुलीही करतात. या दोघांच्या पाठिंब्यामुळे कारवाई होत नसल्यामुळे या अवैध फेरीवाल्यांची दादागिरी वाढत चालली आहे.

नालासोपारात धंदा करणाऱ्या समारे दहा हजारांहून अधिक फेरीवाल्यांकडे स्थानिक वास्तव्याच्या पुरावा नाही. ५० टक्क्यांहून अधिक फेरीवाल्यांकडे, तर वसईतील आधारकार्ड नाही. दुसरीकडे बेशिस्त रिक्षाचालकांनीही रस्त्यावर अतिक्रमण करण्यास सुरुवात केली आहे. ज्या नाक्यावर जास्त प्रवासी भेटतात, त्याठिकाणी अतिक्रमण करून बेकायदा रिक्षा स्टॅण्ड सुरू करण्यात आले आहेत. उर्वरित सहा पदरी रस्त्यांवर ट्रॅव्हल्सच्या बसेस, क्रेन आणि वाहने दुरुस्ती करणाऱ्या गॅरेजनी अतिक्रमण केले आहे. त्यामुळे नालासोपाऱ्यातील सर्वच मार्गावर वाहतूक कोंडीची समस्या अधिक जटिल बनू लागली आहे. अतिमहत्त्वाची आणि पालिकेची ही वाहने या सर्वच रस्त्यांवरील वाहतुक कोंडीत अडकून पडत असतानाही पालिकेकडून फेरीवाले, रिक्षाचालक, गॅरेजवाले, अवैध पार्किंग यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही. अनेक रस्त्यांच्या कडेला बेकायदा बाजार भरवले जात आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी नागरिकांच्या गाड्यांची गर्दी होऊन वाहतूक कोंडी होते. नालासोपारा पूर्वेकडील कोणत्याही परिसरात कोणतीही दुर्घटना घडली किंवा पोलीस, अग्निशमन दलाची गरज भासल्यास ती वेळेवर पोहचत नसल्याचे अनेक घटनांवरून दिसून आले आहे.

■ पेल्हार फाटा येथे विद्युत रोहित्राला आग लागल्याची घटना घडली होती. ही आग विझविण्यासाठी पालिकेच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते. परंतु नालासोपारा पूर्वेतील भागात रस्त्यावर भरणाऱ्या बाजारामुळे वाहतूक कोंडी निर्माण होऊन बराच वेळ हे वाहन अडकून पडले होते. त्यामुळे वेळेवर मदतकार्य करता आले नाही.

आचोळे रोडवरील एका रुग्णाला उपचारासाठी तातडीने रुग्णालयात न्यायची वेळ आली होती. त्यासाठी बोलावलेली रुग्णवाहिका वाहतूक कोंडीत अडकून पडली. त्यामुळे रिक्षातून महिलेला रुग्णालयात न्यावे लागले होते. वेळेवर उपचार न मिळाल्याने काही दिवसांनी महिला मरण पावली. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत अत्यावश्यक सेवा देणारी वाहनेही सर्वसामान्य वाहनांप्रमाणे अडकू लागली, तर नागरिकांना अत्यावश्यक सेवा वेळेत मिळणार कशी, असा प्रश्न उपस्थित करून अगोदर फेरीवाला मुक्त रस्ते करा आणि मगच मते मागायला या, असे नागरिकांकडून ठणकावले जात आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकमत पान. क्र. ०२

# भ्रष्टाचारी नेते भाजपबरोबर जाताच त्यांच्या फायली बंद

## काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांची टीका

लोकमत न्यूज नेटवर्क



मीरा रोड : भ्रष्टाचाराचा आरोप करून नेता सरकारमध्ये सामील होताच राज्याच्या तिजोरीच्या चाव्या त्याच्या हाती दिल्या गेल्या. अनेकांच्या भ्रष्टाचाराच्या फायली बंद केल्या, अशी टीका करीत भ्रष्टाचारी भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारला घालवा, असे आवाहन काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी मीरा रोड येथील जाहीर सभेत शनिवारी केले.

मीरा-भाईंदर विधानसभेचे उमेदवार मुझफ्फर हुसेन यांच्या प्रचार सभेला थोरात यांच्यासह शिवसेना नेते अनिल देसाई उपस्थित होते. स्थानिक आमदारांनी मीरा-भाईंदर शहराचे दहा वर्षांत वाटोळे केले, अशी टीका त्यांनी केली. भाजपला देश संविधानानुसार नाही तर हुकूमशाहीने चालवायचा आहे. महायुतीचे सरकार खोक्यांचे आणि भ्रष्टाचाराच्या पायावर उभे आहे. राज्यात गुन्हेगारी प्रचंड वाढली आहे. भाजपचा आमदार पोलिस ठाण्यात गोळीबार करतो, अमली पदार्थांचा विळखा पडला आहे, मुली-महिलांवरील अत्याचार वाढले आहेत, असा आरोप थोरात यांनी केला.

कोरोनाच्या संकटातून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राला सुखरूप काढले. साऱ्या जगाने व सर्वोच्च न्यायालयाने कौतुक केले, पण कोरोना जाताच कटकारस्थान केले. राज्यातले उद्योग पळवले, राज्यावर ८ ते १० लाख कोटींचे कर्ज केले आहे, असा आरोप अनिल देसाई यांनी केला.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

सामना पान. क्र. ०७

# मीरा-भाईंदरच्या विकासाची 'पंचसूत्री' जाहीर

## महाविकास आघाडीला विजयी करण्याचे आवाहन

भाईंदर - बेकायदा बांधकामे, पाणीटंचाई, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, विकासकामात भाजप, मिंधेंच्या आमदारांची टक्केवारी यामुळे मीरा-भाईंदरचा सर्वांगीण विकास लटकला आहे. यामुळे या निवडणुकीत जनता महायुतीला धडा शिकवेल, असा इशारा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज दिला. प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीचे उमेदवार मुझ्झफर हुसेन यांचा मीरा-भाईंदर शहरासाठी 'लोकसेवेची पंचसूत्री' या निवडणूक जाहीरनाम्याचे प्रकाशन करण्यात आले.

मीरा-भाईंदर शहराचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यासाठी महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार अनिल देसाई यांनी भाजपच्या कार्यपद्धतीवर जोरदार टीका केली, भाजपमुळे मीरा-भाईंदर शहराचा बट्ट्याबोळ झाला आहे. त्यामुळे शहरात खराब रस्ते आणि पाण्याची समस्या भेडसावत असल्याचा आरोप त्यांनी केला. तर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी भाजप सर्वत्र द्वेष पसरवत असताना हुसेन यांनी शहरात मानवता धर्म टिकवला असल्याचे सांगितले. यावेळी कर्नाटकचे आमदार हंपत्र गौडा, केरळचे आमदार संजीव जोसेफ, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रभाकर म्हात्रे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष ॲड. विक्रम तरे-पाटील, सी.पी.आय (एम ) चे पुलक चक्रवर्ती, आनंद सिंह आदी उपस्थित होते.



### या कामांना प्राधान्य

मीरा-भाईंदर शहरातील पाणीटंचाईची समस्या दूर करणे, आरोग्य सेवा बळकट करणे, मेट्रो सेवा सुरू करणे, जुन्या इमारतीचा विकास करण्यासाठी धोरण निश्चित करणे, शिक्षण क्षेत्राला बळकटी देणे, रोजगारासाठी लघु उद्योगांना प्रोत्साहन देणे, दिवाणी न्यायालय उभारणे, पोलीस मुख्यालय उभारणे, मीरा रोड, भाईंदर स्थानकावर लांबपल्ल्याच्या रेल्वे गाड्यांसाठी रेल्वे टर्मिनस उभारणे आदी बाबींचा जाहीरनाम्यात समावेश करण्यात आला आहे.

सामना पान क्र. ६

# मीरा रोडमध्ये भाजी विक्रेत्याची गळा चिरून आत्महत्या

भाईंदर, दि. १० (सा.वा.) - नयानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत भाजी विक्रेत्याने स्वत:चा गळा चिरून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. मोहम्मद यार (२३) असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. मोहम्मद हा एक महिन्यापूर्वीच उत्तर प्रदेश येथून मीरा रोड येथे आपल्या भावाकडे नोकरी-धंद्यासाठी आला होता.

नयानगर परिसरातील ऑर्चिड अपार्टमेंटजवळ असलेल्या दुकानात तो भाऊ व मित्रांसोबत राहात होता. मात्र शनिवारी रात्री उशिरा तो सार्वजनिक शौचालयात जातो असे सांगून निघाला आणि शौचालयातच त्याने स्वत:चा गळा चिरून आत्महत्या केली. याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मोहम्मदचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी जे. जे. रुग्णालयात पाठवला आहे. त्याने प्रेमसंबंधाच्या दबावातून ही आत्महत्या केल्याचा संशय पोलिसांनी वर्तवत अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. मोहम्मदची हत्या की आत्महता, त्याने ही आत्महत्या का केली याचा तपास नयानगर पोलीस करीत आहेत.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुढारी पान क्र. 07

# घोडबंदर किल्ल्यावरील झेंडा काढा मगच जतन

## पुरातत्व संचालनालयाची स्पष्टोक्ती; पालिकेला मुदतवाढ देण्यासही टाळाटाळ


**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ल्याच्या संवर्धनाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याच्या जतनासाठी मात्र राज्याच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने पालिकेला मुदतवाढ देण्यास टाळाटाळ केली आहे. आधी या किल्ल्यावर बसविण्यात आलेल्या १०० फुटी झेंडा काढून टाकण्याचे निर्देश पालिकेला देण्यात आले असून मगच किल्ल्याच्या जतनाच्या परवानगीचा विचार करू, असा पावित्रा संचालनालयाकडून घेण्यात आला आहे.

तत्पूर्वी किल्ल्यातील सुशोभीकरण करण्यासाठी संचालनालयाच्या यादीतील ठेकेदाराकडूनच त्याचे काम करण्याची अट घालण्यात आल्याने तूर्तास पालिकेची पंचाईत झाली आहे. शहरातील ऐतिहासिक घोडबंदर किल्ल्याचे संवर्धन तसेच सुशोभीकरणाचे लोकार्पण ३० सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी किल्ल्याच्या संवर्धनासह सुशोभिकरणासाठी राज्याच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचलनालयाकडून महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक योजनेंतर्गत पालिकेला १८ जुलै २०१९ रोजी परवानगी देण्यात आली. २१ जुन २०१९ रोजीच्या करारनाम्यातील अटी शर्तीनुसार घोडबंदर किल्ल्याच्या संवर्धनासह त्यातील सुशोभीकरणाला पुरातत्व विभागाकडून पालिकेला ५ वर्षांची मुदत देण्यात आली होती. ती मुदत २४ जून रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे किल्ल्याचे जतन करण्यासाठी पालिकेला १० वर्षांची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी पालिकेकडून संचालनालयाकडे करण्यात आली आहे. त्यासाठी पालिकेकडून संचालनालयाकडे सतत पत्रव्यवहार करण्यात येत आहे. तत्पूर्वी या किल्ल्याच्या बुरुजावर १०० फुटी भगवा झेंडा किल्ल्याच्या बसविण्यात आला आहे. त्यासाठी संचालनालयाची परवानगी घेणे आवश्यक असताना ती घेण्यात आली नसल्याने त्यावर संचालनालयाकडून आक्षेप घेण्यात आला आहे.

दरम्यान किल्ल्याच्या संवर्धनाचे काम पूर्ण झाल्याने त्यातील सुशोभीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. मात्र पालिकेला देण्यात आलेली मुदत संपुष्टात आल्याने संचालनालयाकडून मुदतवाढ मिळणे पालिकेसाठी आवश्यक ठरले आहे. त्यासाठी पालिकेने संचालनालयाकडे सतत पत्रव्यवहार केला असून संचालनालयाने मात्र किल्ल्यावर बसविण्यात आलेला झेंडा आधी काढून टाकण्याचे निर्देश पालिकेला दिले आहेत. तदनंतर पालिकेकडून प्रस्तावित असलेल्या सुशोभीकरणाच्या कामाचा विचार करण्याबाबत संचालनालयाने स्पष्ट केले आहे. त्यातच किल्ल्याचे संवर्धन झाल्याने किल्ल्याचे जतन करणे, त्याचे नियमित संचलन करण्यास १० वर्षांची मुदतवाढ देण्याची मागणी पालिकेने केली आहे. मात्र त्यासाठी संचालनालयाकडून ठोस कार्यवाही केली जात नसल्याचे समोर आले आहे.

### प्रस्तावित कामे संचालनालयाच्या यादीतील ठेकेदारामार्फतच करण्याचे निर्देश



किल्ल्यातील प्रस्तावित कामांचा सविस्तर प्रस्ताव संचालनालयाच्या यादीतील वास्तुविशारदाकडूनच तयार करून तो तांत्रिक मान्यतेसाठी संचालनालयाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. या तांत्रिक प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर त्याचा प्रशासकीय व आर्थिक प्रस्तावावरील मान्यतेची कार्यवाही मात्र पालिकेकडून करण्यात यावी. त्याला पालिकेने मान्यता दिल्यानंतर प्रस्तावित कामे संचालनालयाच्या यादीतील ठेकेदारामार्फतच करण्याचे निर्देश संचालनालयाकडून पालिकेला देण्यात आल्याने पालिकेची पुरती पंचाईत झाली आहे. अशातच किल्ल्याचे पावित्र्य राखण्यासाठी त्यातील सुरक्षेची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न उपस्थित झाला असताना त्यावर संचालनालयाकडून ब्र काढले जात नाही. तर हि जबाबदारी पालिकेकडूनच पार पाडली जात आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुढारी पान. क्र. ०७

पुढारी पु. पान. ०३

# छटपूजेच्या दिवशी उत्तर भारतीय तरुणाला बेदम मारहाण

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा रोड येथे छठपूजेच्या दिवशी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सैन्य दलातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या मुलाला त्याच्याच कार्यालयात घुसून बेदम मारहाण केली. याप्रकरणी भाजप कार्यकर्त्यांवर मिरा रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरारोड येथे राहणारे माहिती अधिकार कार्यकर्ते राजू गोयल यांनी भाजपच्या मेहता समर्थक पदाधिकारी भावना तिवारी यांच्या फेसबुक पोस्टवर आक्षेपार्ह टिप्पणी केल्याची घटना घडली होती. त्यानंतर भावना तिवारी मेहता समर्थक आणि काही महिला व पुरुष कार्यकर्त्यांसह राजू गोयल यांच्या कनकिया कार्यालयात गेले.

त्यावेळी त्याठिकाणी राजू गोयल हे उपस्थित नव्हते. त्याच कार्यालयात उपस्थित असलेल्या अंकित मिश्रा नावाच्या तरुणाने राजू गोयल यांच्याकडून अर्धे कार्यालय भाड्याने घेऊन ते त्यांची वैयक्तिक कामे करत आहेत. या तरुणाला भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राजू गोयल कुठे आहे, असे विचारत त्यांच्याशी भांडण व मारहाण करण्यास सुरुवात केली. जीव वाचवण्यासाठी मिश्रा कार्यालयातून बाहेर आले असता बाहेरही बेदम मारहाण केली. त्यानंतर त्यांना बळजबरीने ओढून मारहाण करून ऑटोरिक्षात बसवून मीरारोड पोलिस ठाण्यात नेले.

अंकित मिश्रा यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी भाजप कार्यकर्त्या भावना तिवारी आणि इतर १० ते १२ कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल केला आहे. तर हेमांगी पाटील यांच्या तक्रारीवरून अंकित मिश्रा आणि राजू गोयल यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंकितच्या कुटुंबीयांचे म्हणणे आहे की, त्यांचा मुलगा निर्दोष असून या प्रकरणात त्याला अमानुषपणे मारहाण करून या प्रकरणात नाहक अडकवण्यात आले आहे.

भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या या कृतीमुळे उत्तर भारतीय समाजात संताप पसरला असून छठ पूजेच्या दिवशी उत्तर भारतीय तरुण अंकित मिश्रा याला भाजप उमेदवार नरेंद्र मेहता यांना पाठिंबा देणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांनी नाहक बेदम मारहाण केली आहे. अंकित मिश्रा हे गंभीर जखमी झाले असून याबाबत मीरा-भाईंदरमध्ये मोठ्या संख्येने राहणाऱ्या उत्तर भारतीय समाजातून या घटनेवर भाजपा विरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

# नालासोपाऱ्यात १२१ जणांचे गृहमतदान

**विरार :** वसईपाठोपाठ आता नालासोपारा मतदारसंघात ही शनिवारी वयोवृद्ध व ज्येष्ठ नागरिकांची गृह मतदान प्रक्रिया पार पडली. १३० अर्जदारापैकी १२१ नागरिकांनी उस्फुर्तपणे मतदान करीत आपल्या मतदानाचा हक्क बजावला. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार ८५ वर्ष व त्यापेक्षा जास्त वय असणाऱ्या मतदारांना तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या मतदारांना गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेचा लाभ घेण्याकरीता संबंधित मतदारांना आवश्यक असलेल्या १२ डी नमुन्याचे वाटप केले होते. त्यापैकी १३० मतदारांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केले होते. शनिवारी या मतदारसंघात या मतदानांची प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेसाठी १३ पथके तयार करण्यात आली होती. त्यांच्याद्वारे मतदारांच्या घरी मतपेटी घेऊन जाऊन मतदान घेण्यात आले. गृह मतदानासाठी नोंदणी झालेल्या १३० मतदारांपैकी १२१ नागरिकांनी गृह मतदानाचा हक्क बजावला असे निवडणूक निर्णय अधिकारी शेखर घाडगे यांनी सांगितले आहे. यापूर्वी ज्येष्ठ नागरिक आणि अपंग मतदारांना मतदान करण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र. यावेळी गृह मतदान पद्धतीमुळे ज्येष्ठ नागरिक आणि अपंगांना मतदान करणं सोप्प झालं आहे. त्यामुळे मत टक्का वाढण्यास ही मोठी मदत होणार आहे. तर आदल्या दिवशी १३३ वसई मतदारसंघात ही गृहमतदान घेण्यात आले होते. तेव्हा ३७४ नागरिकांपैकी ३६० नागरिकांनी गृहमतदानाचा हक्क बजावला होता.

# नाकाबंदीत ४४ गुन्हे दाखल

**विरार :** महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूकं २०२४ च्या 'आदर्श आचारसंहिताच्या' अनुषंगाने मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्त मधुकर पांडे व अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे व मीरा-भाईंदर परिमंडळाचे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्या आदेशावरून मीरा-भाईंदर शहरातील सर्व पोलीस ठाण्यात काशिमीरा, काशिगाव, मिरारोड, नयानगर, नवघर, भाईंदर, उत्तन सागरी पोलीस ठाण्यात ऑल आउट कोंबिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी दरम्यान एकूण ४४ गुन्हे दाखल केले आहेत. मीरा- भाईंदर परिमंडळ-१ अंतर्गत असलेल्या ३ सहाय्यक पोलीस आयुक्त , सात वरिष्ठ पोलीस निरीक्षक, १४ पोलीस निरीक्षक, सहा. पोलीस निरीक्षक , पोलीस अंमलदार १४० यांनी सदर कारवाईत सहभाग घेतला. यात पोलिसांनी ऑल आउट कोबिंग ऑपरेशन दरम्यान फरारी ७ आरोपी मिळून आले. त्यांना ताब्यात घेवून कारवाई करण्यात आलेली आहे. अंमली पदार्थाचे सेवन केल्याबाबत ६ इसमांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

CamScanner

Scanned with OKEN Scanner

पुढारी : पु. पान. ०१

## गावठी कट्टा, काडतूस पकडले

पालघर : तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी शुक्रवारी संध्याकाळी नालेश्वर नगरच्या पाठीमागील मोकळ्या जागेत रुद्रेश सावंत (२४) या आरोपी तरुणाला पकडले. झडती घेतल्यावर त्याच्याकडे एक गावठी कट्टा व एक काडतूस बेकायदेशीरपणे बाळगलेले आढळले. तुळींज पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

## नायगावमध्ये लाखोंचा गुटखा जप्त

पालघर : नायगाव पोलिसांनी मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील बाफाणे येथील करिश्मा ढाब्यासमोर शुक्रवारी लाखो रुपयांचा गुटखा पकडला आहे. पोलिसांनी टेम्पो अडवल्यावर त्यात वेगवेगळ्या कंपनीचा गुटखा आढळला. आरोपी चालक मोहम्मद अझरुद्दीन शेख (३०) हा महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा, तंबाखू पान मसाला कोठून तरी आणून कोठेतरी विक्रीकरिता नेत असताना आढळला. पोलिसांनी १० लाखांचा टेम्पो, विविध कंपनीचा गुटखा असा एकूण ४३ लाख २५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. नायगाव पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून आरोपी चालकाला अटक केली आहे.

महाराष्ट्र धर्मा - पु. पान. क्र. २

## मिरारोडमध्ये तरुणाचा संशयास्पद मृत्यू

मिरा-भाईंदर : मिरा रोडच्या नयानगर भागात एका तरुणाचा मृतदेह शनिवारी आढळून आला.

मिरा रोडच्या नयानगर भागात व्यवसाय करणाऱ्या २२ वर्षीय मोहम्मद यार याचा मृतदेह शनिवारी रात्री एका शौचालयात आढळला. त्याच्या शरीरावर शस्त्राने वार केल्याच्या खुणा असल्यामुळे त्याची हत्या करण्यात आल्याचे म्हटले जात होते. नयानगर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता तो शौचालयात गेला त्यावेळी एकटाच असल्याचे दिसून आले आहे. तो मागील काही दिवसांपासून मानसिकरित्या आजारी होता. त्यामुळे त्याने स्वतःहून शस्त्राने वार करून घेत आत्महत्या केली असावी, असा अंदाज पोलिसांकडून वर्तवला जात आहे. मृतदेह मुंबईतील जे जे रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

N. B. T. पान क्र. 05

## गांजा की तस्करी मामले में दो गिरफ्तार

■ निसं, नालासोपारा: मीरा भाईंदर-वसई विरार पुलिस आयुक्तालय के क्राइम ब्रांच यूनिट 3 ने शनिवार को वसई फाटा इलाके में छापा मार कर गांजा की तस्करी के आरोप में दो लोगों को गिरफ्तार किया है। आरोपियों के पास से 8 लाख 72 हजार रुपये का गांजा बरामद हुआ है। आरोपी मानखुर्द के निवासी हैं।

## नकली पुलिस ने बुजुर्ग से गहने ठगे

■ निसं, नालासोपारा: एव्हरशाइन इलाके में शनिवार की सुबह दो अज्ञात लोगों ने 70 वर्षीय वृद्ध के साथ ठगी की है। खुद को पुलिस अधिकारी बताते हुए बुजुर्ग की 70 हजार रुपये कीमत की गोल्ड चेन लेकर फरार हो गए। शिकायतकर्ता गौरीशंकर यादव (70) ने बताया कि थॉमस चर्च परिसर के पास बाइक सवार लोगों ने उसे ठग लिया।

## युवती ने आत्महत्या की, ADR दर्ज

■ निसं, विरार: गोपचर पाडा में शनिवार की दोपहर एक युवती ने बिल्डिंग की छत से कूदकर अपनी जान दे दी। पुलिस ने एडीआर दर्ज कर लिया है। विरार पुलिस के अनुसार, गोपचर पाडा में रहनेवाली युवती का अपने परिजन से किसी बात को लेकर विवाद हुआ था।

# चुनावी समर में घमासान, चढ़ने लगा सियासी पारा!

### मीरा-भाईंदर की दोनों विधानसभाओं पर उम्मीदवारों ने भरी हुंकार

■ अमित तिवारी, मीरा-भाईंदर

जैसे-जैसे चुनाव की तारीख नजदीक आ रहे है, मीरा-भाईंदर की दोनों विधानसभा सीटों पर चुनावी मौसम का पारा भी चढ़ने लगा है। निर्वाचन क्षेत्र 145 मीरा-भाईंदर और निर्वाचन क्षेत्र 146 ओवला-माजीवाडा के उम्मीदवारों ने अपना चुनावी प्रचार भी तेज कर दिया है। हर बीतते दिन के साथ शहर का राजनीतिक माहौल गरमाने लगा है। मीरा-भाईंदर में जहां त्रिकोणीय मुकाबला है, तो वही ओवला-माजीवाडा में लगभग एक तरफा मुकाबला दिखाई दे रहा है। मीरा-भाईंदर निर्वाचन सीट पर बीजेपी से नरेंद्र मेहता, कांग्रेस से मुज़फ्फर हुसैन के बीच मुकाबला है, तो वही बागी गीता जैन भी निर्दलीय चुनावी मैदान में कूद गई है, जिससे यहां त्रिकोणीय मुकाबला होगा। यहां पर कांग्रेस के मुज़फ्फर हुसैन लगातार अपनी सभाएं कर रहे है। सोमवार को बीजेपी के नरेंद्र मेहता ने भी 'पत्रकारों की अदालत' का आयोजन किया था, जबकि मंगलवार को गीता जैन ने भाईंदर में 'निर्धार सभा' में लोगों को संबोधित किया। इसी तरह, बुधवार को ओवला-माजीवाडा के उम्मीदवार प्रताप सरनाईक ने भी 'प्रचार यात्रा' निकाल कर वोटरों को अपने पक्ष मे करने की रणनीति अपनाई। ओवला-माजीवाडा में शिवसेना शिंदे गुट के प्रताप सरनाईक और शिवसेना यूबीटी के नरेश मनेरा के बीच मुकाबला है।

**चुनावी सभी में एक-दूसरे पर आरोप-प्रत्यारोप का दौर शुरू**





गीता जैन


मुज़फ्फर हुसैन


प्रताप सरनाईक

**हुसैन बोले 'जय श्रीराम'**

मीरा-भाईंदर में कांग्रेस के उम्मीदवार मुजफ्फर हुसैन ने सबसे पहले अपना चुनाव प्रचार शुरू किया। मुस्लिम मतों के साथ उनकी नजर हिंदू मतों पर भी है। उन्होंने मुस्लिम बहुत इलाकों में विभिन्न पदयात्रा आयोजित की, तो वही हिंदू बहुल इलाकों में 'जय श्रीराम का नारा' लगाकर मतदाताओं को रिझाया।

### 'पत्रकारों की अदालत' में आए नरेंद्र मेहता

बीजेपी के उम्मीदवार नरेंद्र मेहता ने 'पत्रकारो की अदालत' का आयोजन किया। लाइव कार्यक्रम में उन्होंने सभी सवालों का जवाब दिया। इस दौरान उन्होंने अपने खिलाफ हो रहे दुष्प्रचार और अन्य आरोपो का भी जवाब दिया। उन्होंने प्रतिद्वंद्वी गीता जैन और मुजफ्फर हुसैन पर भी निशाना साधा।



### रैली से सरनाईक ने प्रचार शुरू किया

शिवसेना शिंदे गुट के उम्मीदवार प्रताप सरनाईक ने ओवला माजीवाडा विधानसभा निर्वाचन क्षेत्र मे चुनावी रैली के जरिए अपने चुनावी प्रचार को आरंभ किया। यह चुनावी रैली लता मंगेशकर नाट्यगृह पर खत्म हुई। सरनाईक ने इस दौरान विगत पांच वर्षो मे किए गए अपने कामो पर जनता से वोट मांगा।

### 'निर्धार सभा' में विरोधियों पर गरजी जैन

मौजूदा विधायक और बगावत कर निर्दलीय चुनाव लड रही गीता जैन ने मीरा-भाईंदर मे 'निर्धार सभा' का आयोजन किया और अपने विरोधियो को आड़े हाथो लिया। उन्होने टिकट न मिलने पर बीजेपी के वरिष्ठ नेताओ पर उन्हे धोखा देने का भी आरोप लगाया और पार्टी के कुछ स्थानीय नेताओ को इसका जिम्मेदार बताया। उन्होने विरोधियो को जहा राक्षस कहा, तो खुद की तुलना मां दुर्गा से की। उनके भाषण के केंद्र मे भ्रष्टाचार के अलावा मंदिर, हिन्दू, हिंदुत्व केंद्र मे रहे।

## आज केंद्रीय मंत्री गोयल मीरा-भाईंदर में करेंगे चुनाव प्रचार

■ निसं, मीरा-भाईंदर: सोमवार को केंद्रीय मंत्री पीयूष गोयल मीरा-भाईंदर में बीजेपी उम्मीदवार नरेंद्र मेहता के प्रचार के लिए आ रहे है। गोयल दोपहर 2 बजे भाईंदर पश्चिम मे वकीलों, डॉक्टरों, व्यापारियों से संवाद करेंगे। बुधवार (13 नवंबर) को उत्तर प्रदेश के मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ का मीरा-भाईंदर में आगमन होगा। वे मीरा-रोड के एस. के. स्टोन मैदान में जनसभा को संबोधित करेंगे।




CamScanner

Scanned with OKEN Scanner

नवभारत पृ. पान. क्र. ०३

# उत्तराखंड के CM धामी ने किया वसई-विरार का दौरा



■ नालासोपारा, (सं). पिछले कई वर्षों से इस क्षेत्र में एक ही परिवार के पिता - पुत्र ने मिलकर शहर का विकास रोक रखा है, लेकिन आज इस सभा में उपस्थित भीड़ को देख कर महसूस हो रहा है कि अब यहां की जनता बदलाव चाहती है और निश्चित रूप से इस बार पालघर जिले के तीनों सीट पर कमल खिलेगा, इसका हमें पूर्ण विश्वास है. यह बातें वसई के एवरसाइन सिटी स्थित ब्राड़वे हॉल में भाजपा के नालासोपारा उम्मीदवार राजन नाईक व वसई उम्मीदवार स्नेहा प्रेमनाथ दुबे के चुनाव प्रचार को लेकर आयोजित सभा के दौरान उत्तराखंड के मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी ने कही. इसके साथ ही धामी ने लोगों से भाजपा के पक्ष में मतदान करने की अपील की. बता दें कि रविवार को विधानसभा चुनाव को लेकर उत्तराखंड के मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी ने वसई व नालासोपारा विधानसभा क्षेत्र का दौरा किया. इस दौरान वसई पूर्व के एवरसाइन सिटी स्थित ब्राड़वे हॉल में सभा आयोजित किया गया था. इस दौरान धामी का स्वागत करने के लिए बड़ी संख्या में उपस्थित उत्तराखंड के लोगों ने पूरे जोश के साथ स्वागत किया. इसके पूर्व भाजपा पदाधिकारियों ने उनका स्मृति चिन्ह देकर सत्कार किया. इस अवसर पर उनके साथ भाजपा वसई विरार जिलाध्यक्ष महेंद्र पाटिल, उपाध्यक्ष अमित ओमप्रकाश दुबे, भाजपा नेता अमरजीत मिश्रा, मनोज पाटिल, अभय कक्कड़ सहित बड़ी संख्या में भाजपा, महिला मोर्चा, युवा मोर्चा के पदाधिकारी एवं कार्यकर्ता मौजूद थे.

## टेम्पो संग लाखों का अवैध गुटखा जब्त

**वसई.** नायगांव पुलिस ने बापाने क्षेत्र से लाखों रुपए का अवैध गुटखा से भरा टेम्पो जब्त किया है. पुलिस ने एक आरोपी को गिरफ्तार भी किया है. जानकारी के अनुसार नायगांव पुलिस ने बापाने क्षेत्र के करिश्मा ढाबा के पास एक आयशर टेम्पो से अलग-अलग कंपनियों के अवैध गुटखा जब्त किया हैं. जब्त किए गए गुटखा की कुल कीमत 33 लाख 25 हजार 160 रूपये और इसके साथ ही टम्पो की कीमत 10 लाख रुपए आंकी गई है. कुल 43 लाख 25 हजार 160 रुपए का माल पुलिस ने जब्त किया है. पुलिस ने मोहम्मद शेख नामक आरोपी को गिरफ्तार कर लिया है. नायगांव पुलिस गिरफ्तार आरोपी के खिलाफ बीएनएस 2023 की विभिन्न धाराओं के तहत केस दर्ज कर आगे की कार्रवाई में जुट गई हैं.

CamScanner
Scanned with OKEN Scanner